दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

SHREE VAIBHAVLAXMI ENTERPRISES

URGENTLY REQUIERED
MALE CANDIDATES - FOR PROPERTY REGISTRATION
WORK IN PANVEL AND NAVI MUMBAI
MALE CANDIDATES - OFFICE BOY
MALE/FEMALE CANDIDATE -
FOR XEROX MACHINE OPERATOR WITH BASIC COMPUTER KNOWLEGE
E-MAIL-shreevaibhavlaxmienterprises@gmail.com MOB.NO. 9892848890
ADD. - SHOP NO.02, GROUND FLOOR, BULAND 2,
PLOT NO. 22, SECTOR 5A, NEW PANVEL, RAIGAD 410 206.

वर्ष २० वे | अंक १६० | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा नामकरण वाद उच्च न्यायालयात

**दै.रायगड नगरी । उरण**

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यावरून अनेक वर्षे राजकारण सुरु आहे. राजकीय नेत्यांकडून, सत्ताधारी पक्षाकडून लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्यावरून नेहमी आश्वासन मिळत आहे पण कार्यवाही मात्र शून्य आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेता दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्याबाबत केंद्र सरकारकडून होत असलेल्या विलंबाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झाली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणास विलंब होत असल्यामुळे प्रकाशझोत सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विकास परशुराम पाटील यांनी ही याचिका दाखल केली आहे. यात केंद्र सरकार,महाराष्ट्र शासन, सिडको, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. तसेच अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेड यांना प्रतिवादी केले आहे. विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी जोर धरत आहे. त्यासाठी प्रकल्पग्रस्तांचा लढा सुरू असून, राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्थांनीही पाठिंबा दर्शविला आहे.विशेष म्हणजे राज्य सरकारने नामकरणाचा ठराव मंजूर करून तो केंद्राकडे पाठविला आहे. मात्र, अंमलबजावणीस विलंब होत आहे.





आता विमानतळाच्या उद्घाटनाची तारीख निश्चित होऊनही नामकरणाचा प्रश्न जैसे थे आहे. प्रकल्पग्रस्त हवालदिल झाल्याने या लढ्याला कायदेशीर दर्जा प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने विकास पाटील यांनी थेट उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. विमानतळाला दिबांचे नाव द्यायचे ठरले असेल तर त्याबाबतचा पत्रव्यवहार न्यायालयात सादर करणे अनिवार्य आहे.आता विमानतळ नामकरणाचा वाद मुंबई उच्च न्यायालयात गेल्याने हा प्रश्न लवकरच मार्गी लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. नामकरण लढ्याला आता कायदेशीर स्वरूप प्राप्त झाल्याने हा नामकरणाचा लढा अधिकच तीव्र झाला असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव लवकर देण्यात यावे ही मागणी अधिकच तीव्र झाली आहे. विमानतळ नामकरण वरून राजकारण तापले असून याबाबत केंद्र सरकारची भूमिका नेमकी काय आहे हे लवकरच केंद्र सरकारला स्पष्ट करावे लागणार आहे. त्यामुळे सर्व स्थानिक भूमीपुत्र, प्रकल्पग्रस्त, लोकनेते दिबा पाटील यांचे समर्थक यांच्या नजरा केंद्र सरकारच्या भूमिकेकडे लागले आहेत.

## श्रीवर्धन तालुक्यात एकूण ८८२५ गणरायांची स्थापना होणार

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

सन २०२५ च्या गणेशोत्सवात श्रीवर्धन तालुक्यात भाद्रपद ४ शु. गणेश चतुर्थी रोजी एकूण ८८२५ गणपती बाप्पांची स्थापना होणार असून या मध्ये खासगी ८८२१ तर ४ सार्वजनिक गणपती बाप्पा ची स्थापना होणार आहे.



या मध्ये दीड दिवसांचे २२६० सात दिवसांचे ४२६० अनंत चतुर्थीचे २२९४ तर २१ दिवसांचे ७ गणपती तर सार्वजनिक ४ गणपती स्थानापन्न होणार आहेत, गणेशोत्सव साजरा करण्यासाठी श्रीवर्धन वासिय मुंबई तसेच विविध शहरातून मोठ्या प्रमाणात गावाकडे आले आहेत, गणरायाच्या आगमनासाठी शहरासह खेडे गावातुन मोठया उत्साहात गणेश भक्त तयारीत असल्याचे पाहवयास मिळत आहे, पावसाची रिपरिप चालू असली तरी गणेश भक्तात मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

## घरफोडीचे २२ गुन्हे दाखल असलेल्या बंटी- बबलीला अटक

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्यातील विविध जिल्ह्यांत २२ घरफोड्या, चोऱ्या करणाऱ्या आधुनिक बबली बंटीला उरण पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. नवनीत नाईक (४५) व स्मिता नाईक (४१) अशी या पती पत्नीची नावे आहेत. उरण तालुक्यातील दादरपाडा येथील रहिवासी राजु झुगरे (४४) ८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी कामानिमित्ताने घराला कुलूप लावून बाहेर गेले होते.त्याच गावात पती नवनीत नाईक व पत्नी स्मिता नाईक हे विवाहित जोडपे भाड्याने राहात होते. चोरी , घरफोडीचाच धंदा करणाऱ्या या जोडप्यांने फिर्यादी झुगरे यांच्या बंद घराची आधी रेकी केली.



त्यानंतर डुप्लीकेट चावीने दरवाजा उघडून बेडरूमच्या वार्डरुफमध्ये ठेवण्यात आलेले १३ लाख ७१ हजार रुपये किंमतीचे सोने,चांदीचे दागिने व रोख रक्कम घेऊन पलायन केले.झुगरे घरी आल्यावर त्यांना घरात चोरी झाल्याचे निर्दर्शनास आले.त्यांनी उरण पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवताच गुन्हा दाखल करण्यात आला.याप्रकरणी पोलिसांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली उपनिरीक्षक संजय राठोड यांच्यासह सहा पोलिसांचे पथक तयार करून तपासाला सुरुवात केली. घरफोडी केल्यापासूनच आरोपी पती- पत्नी गावातुन गायब झाल्याचे निर्दर्शनास आले. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला.

यामुळे पोलिसांनी प्रथम नाईक दांपत्याचे मोबाईल नंबर शोधून काढले. त्यानंतर तांत्रिक व गोपनीय माहिती आणि सीसीटीव्ही फुटेज तपासात घरफोडी करून आरोपी नाईक पती-पत्नी उमरोली-पालघर येथे लपून बसल्याचे उघडकीस आले. पोलिस पथकाने अधिक वेळ न दवडता दोन्ही आरोपींवर झडप घालून शिताफीने लागलीच ताब्यात घेतले.तपासाअंती आर- ोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून चोरीचे सर्व दागदागिने हस्तगत करण्यात आले.

अधिक तपास केला असता या बंटी- बबलींने राज्यातील विविध जिल्ह्यांतील ठिकाणी अशाच प्रकारचे एकुण आणखी २२ गुन्हे दाखल असल्याचे निर्दर्शनास आले आहे.यापैकी नवीमुंबई, रायगड, कोल्हापूर येथील गुन्हे उघडकीस आले आहेत.काही गुन्ह्यांमध्ये आरोपींनी शिक्षाही भोगली आहे.दरम्यान न्यायालयाने या आधुनिक बंटी-बबलीला ९ दिवसांच्या पोलिस रिमांडनंतर काल १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याची माहिती तपास अधिकारी संजय राठोड यांनी दिली.

## लग्नाचे आमिष दाखवून महिलेवर लैंगिक अत्याचार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मधील ३० वर्षीय महिलेला घणसोलीमध्ये राहणाऱ्या व्यक्तीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचे तसेच तिच्याकडून तब्बल ६० लाख रुपये उकळून तिची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ध्रुव नंदलाल परमार उर्फ पटेल (३४) असे या आरोपीचे नाव असून त्याने पीडित महिलेचे अश्लिल व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन तिला मारहाण देखील केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. खारघर पोलिसांनी या आरोपी विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

सदर प्रकरणातील पीडित महिला खारघर येथे राहण्यास असून ती हॉटेलमध्ये कामाला आहे. आरोपी ध्रुव परमार सदर हॉटेलमध्ये नियमित जात असल्याने वर्षभरापूर्वी त्याची पीडित महिलेसोबत ओळख झाली होती. या ओळखीतून आरोपी परमार याने पीडित महिलेसोबत प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर त्याने पीडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केले. त्यामुळे पीडित महिला गर्भवती राहिल्याने आरोपी परमार याने जबरदस्तीने तिचा गर्भपात करवून घेतला. याशिवाय त्याने तिच्याकडून थोडे-थोडे करत तब्बल ६० लाख रुपये घेतले.

पीडित महिलेने सदर रक्कम परत मागितली असता, परमार याने तिला तिची रक्कम परत न करता तिची फसवणूक केली. तसेच त्याने तिच्या नकळत तिचे अश्लिल व्हिडिओ काढून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यासोबतच तिला मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे पीडित महिलेने खारघर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी आरोपी ध्रुव परमार उर्फ पटेल याच्या विरुध्द बलात्कार, फसवणूक, मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## गढूळ पाण्यामुळे मुरुडचे नागरिक हैराण

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड तालुक्यातील सतत होणारा धुवाधार पाऊस यामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहत आहेत. नद्यांचे पाणी अक्षरशा लालभडक झाले आहे. त्यामुळे शहराला व आजुबाजूच्या गावांना पाणीपुरवठा करणारे धरण लालभडक झाले आहे. त्यामुळे शहराला व आजुबाजूच्या गावांना लालभडक गाळयुक्त पाणी येत आहे. यावरुन व्हाट्सअप गृपवर जोरदार चर्चा सुरू झाली व एकमेकांना आवाहन करुन थेट नगरपरिषदेत अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी नागरिकांनी धडक दिली.

गेले कित्येक दिवस मुरुड शहराला खारबोली धरणातून लालभडक गाळयुक्त पाणी येत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम दिसून येतो आहे. संपूर्ण मुरुड शहल व आजुबाजूच्या गावांमध्ये सर्दी, खोकला, ताप असे दिसून येत आहे. मुरुड शहरातील समाजसेवक जाहिद फकजी व महेश कारभारी यांनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी धडक दिली असता . हास्यास्पद उत्तर मिळाले की पाणी उकळून घ्यावे. पण गाळयुक्त पाणी कसे काय उकळून प्यावे असा प्रश्न जनमानसातून उमटला आहे.

नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की पाणी इतके गढूळ आहे की फिल्टर यंत्रणा सुद्धा काम करत नाही. तरी नागरिकांनी स्वतः आरोग्याची काळजी घ्यावी असे आव्हान केले आहे.

## बाप्पांचे आगमन अंधारातून

**दै.रायगड नगरी । माथेरान**

बुधवारी श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार असल्याने मंगळवारी बहुतेक गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या गणरायाची मूर्ती घरी आणली आहे तर संत रोहिदास नगरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांनी वाजतग- ाजत आपल्या बाप्पांचे आगमन ढोल ताशांच्या गजरात केले.



परंतु सायंकाळी सात नंतर रस्त्यावर वीज पुरवठा खंडित असल्यामुळे बाप्पांचा प्रवास अंधारातून झाल्याने मंडळाचे अध्यक्ष नितेश कदम यांनी नाराजी व्यक्त केली आहे. निदान गणेशोत्सव काळात दहा दिवस तरी सुरळीत वीज पुरवठा असावा जेणेकरून भाविकांना दर्शनासाठी अंधारातून चाचपडत जावे लागणार नाही असे भाविक बोलत आहेत.






# सोळावं वरीस मतदानाचं!

ब्रिटनमधील मजूर पक्ष सरकारने मतदानाचे किमान वय १८ वरून १६ वर्षे करण्याची घोषणा केली आहे. हा बदल २०२९च्या राष्ट्रीय निवडणुकीपूर्वी लागू होईल. सोळा वर्षीय युवा सैन्यदलात सेवा देतात आणि कर भरतात, त्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क द्यावा, असे सरकारचे मत आहे. ब्रिटनचा हा निर्णय लोकशाहीतील तरुणांचा राजकीय सहभागाचा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मतदारांची वयोमर्यादा कमी करण्यासोबतच मतदार नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्न देखील करण्याचे आश्वासन सरकारने तरुणांना दिले आहे. त्यासोबत मतदान करत असताना आवश्यक असणाऱ्या पुराव्यांबाबत अधिक व्यापक धोरण राबविण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. यामुळे युवकांना लवकर मतदानाची सवय लागेल व भविष्यात मतदानाचे प्रमाण वाढून लोकशाहीला बळ मिळेल, ही राज्यकर्त्यांची अपेक्षा आहे. लेबर पक्षाने निवडणूक जाहीरनाम्यात याबाबत तरुणांना आश्वासन दिले होते; सत्तेत आल्यानंतर ते पूर्ण करण्यासाठी स्टार्मर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. यामुळे अधिकचे सुमारे १५ लाख युवा मतदार २०२९च्या सार्वत्रिक निवडणुकीत सहभागी होतील.सरकारने लोकशाहीच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने हे पाऊल उचललेले आहे, असे स्टार्मर यांचे मत आहे. यापूर्वी स्कॉटलंड आणि वेल्स येथील सोळा वर्षीय नागरिकांना मताधिकार होता, परंतु तो फक्त स्थानिक निवडणुकांसाठी मर्यादित होता; अर्थात असा निर्णय घेणारा ब्रिटन हा जगातील एकमात्र देश नाही. यापूर्वी देखील असे प्रयत्न झालेले आहेत. युरोपातील ग्रीस व ऑस्ट्रिया तसेच अर्जेंटिना व ब्राझील, माल्टा, अर्जेंटिना, इक्वेडोर, क्युबा, निकाराग्वा, ग्रीस, इंडोनेशिया, उत्तर कोरिया या देशांनीदेखील आपल्या मतदारांच्या वयोमर्यादा सोळा वर्षांपर्यंत खाली नेल्या आहेत. विसाव्या शतकात महिला, अशिक्षित आणि इतर गटांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी वयोमर्यादा कमी करण्याची चळवळ सुरू झाली. व्हिएतनाम युद्धादरम्यान अमेरिकेतील १८ वर्षीय सैनिकांना मतदानाचा अधिकार नसल्यामुळे विरोध निर्माण झाला. त्या वेळी 'ओल्ड इनफ टू फाईट, ओल्ड इनफ टू व्होट' ही घोषणा मोठ्या प्रमाणात गाजली होती. भारतात राज्य निवडणुकींसाठी काँग्रेस मतदानाचे वय कमी करू शकत नाही, या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर १९७१ मध्ये २६वी घटनादुरुस्ती करून १८वर्षे वयोमर्यादा लागू करण्यात आली. भारताप्रमाणे कॅनडा, ऑस्ट्रेलिया, व युरोपातील अनेक देशांनी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकांना निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार दिला आहे. १९८८मध्ये ६१व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतात तत्कालीन राजीव गांधी सरकारने मतदाराची वयोमर्यादा २१ वरून १८ वर्षे केली होती. ज्यामुळे त्यावेळी अडीच कोटी तरुण मतदार निर्माण झाले होते. अलीकडे निवडणूक आयोगाने सतरा वर्षे पूर्ण झालेल्या युवकांना मतदार यादीत नाव नोंदवण्याची परवानगी दिली आहे; परंतु, मतदानाचा अधिकार फक्त अठरा वर्षे पूर्ण झाल्यानंतरच मिळतो. सोळा वर्षे वयोगटातील मतदारांना मतदानाचा अधिकार देण्याची मागणी अद्याप भारतात मोठ्या प्रमाणावर चर्चिली गेली नाही. ब्रिटिश राजकीय व्यवस्थेतदेखील या विधेयकाबाबत उलटसुलट चर्चा होताना दिसते आहे. जर सोळा वर्षांखालील तरुण करदाते म्हणून देशाच्या तिजोरीत भर घालीत असतील तर राजकीय निर्णय निर्धारण प्रक्रियेत त्यांना स्थान का नसावे? यासोबत, बँक खाते काढण्याचा जर त्यांना अधिकार असेल तर मतदाता म्हणून का नसावा? हे मुद्दे समर्थनार्थ दिले जात असताना प्रतिपक्षाकडून निवडणुकीत उमेदवारीसाठी वयाची अट का असावी? विवाह, मद्यपान, सैन्यभरती याबाबत सरकार आपल्या धोरणांचा पुनर्विचार करील का? हे मुद्दे विचारण्यात येत आहेत. युवा पिढी तंत्रज्ञानाचा कुशलतेने वापर करून उद्योजक बनत आहे. युरोपीय संघाने देखील तरुणांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी ठराव मंजूर केला आहे. नागरिक शास्त्राच्या शिक्षणासाठी इंग्लंडमधील सरकारने केलेली ही एक प्रकारची गुंतवणूक आहे. परंतु, यात लोकशाही राजकीय व्यवस्थेची गुणवत्ता व स्थिरता याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. काही अभ्यासकांच्या मते हे अल्पवयीन मतदार पालकांच्या प्रभावाखाली मतदान करू शकतात. मतदार वयोमर्यादेचा प्रश्न केवळ कायदेशीर नसून तो लोकशाही, समाजशास्त्र आणि मानसशास्त्राशी निगडित आहे; कारण तरुण भावनिक होऊन मतदान करत असतात. सोशल मीडियाचा वाढलेला प्रभाव, तसेच सर्वच देशांतील सार्वत्रिक निवडणुकींमध्ये परकीय शक्तींकडून अप्रत्यक्षपणे केला जाणारा हस्तक्षेप या बाबी आता सर्व देशांना भेडसावत आहेत. अमेरिकेत पहिल्यांदा जेव्हा ट्रम्प निवडून आले होते त्या वेळी ट्रम्प यांना अमेरिकाविरोधी शक्तींनी मदत केल्याचा आरोप डेमोक्रॅटिक पक्षाने केला होता. शेल कंपन्यांच्या मदतीने विविध राजकीय पक्षांना जो निवडणूक निधी उपलब्ध करून दिला जातो, त्याबाबत देखील आवश्यक कारवाई करण्याची तरतूद या विधेयकात आहे. जगातील सर्वच लोकशाही राजकीय व्यवस्थांमध्ये बहुतांश मतदार हे प्रौढ असतात. इंग्लंडमध्ये घेतल्या गेलेल्या या निर्णयामुळे प्रौढ व तरुण मतदारांच्या संख्येतील तफावतीत निश्चित घट होईल. एफपीटीपी या पद्धतीमुळे वाढलेल्या अतिरिक्त मतदानाचा पूर्ण राजकीय व्यवस्थेवर परिणाम होतोच असे नाही. कारण इंग्लंडमध्येदेखील भारताप्रमाणे मतदारसंघनिहाय मतदान होते व यात सर्वाधिक मते घेणारा उमेदवार विजयी होतो. त्यामुळे वाढलेल्या मतदारांचे प्रमाण मतदारसंघनिहाय तुल्यबळ नसल्याने ते प्रत्येक मतदारसंघावर परिणाम करतीलच असेही नाही. तसेच पहिल्यांदा मतदान करणारे मतदार हे कोणत्याही एका राजकीय पक्षांची व्होट बँक नसतात. भारतात सुरुवातीला या निर्णयाचा राजकीय फायदा काँग्रेसला झाला होता; परंतु, १९९० नंतर देशातील उजव्या शक्तीच्या मागे तरुण मतदार उभा राहताना दिसत आहे, असे अनेक निवडणूक सर्वेक्षणांतून दिसून आले आहे. गेल्या काही निवडणुकांत ऑस्ट्रियामध्ये या मतदारांचा फायदा डाव्या पक्षांना झाला होता, तर ग्रीसमध्ये ही मते मध्यममार्गीय पक्षाकडे वळली होती. थोडक्यात, बहुसंख्य तरुण राजकीय प्रक्रियेत सहभागी झाले तर वर्तमानकालीन प्रश्नांवर ते अधिक लक्ष केंद्रित करू शकतात किंवा राजकीय व्यवस्थेला दबाव तंत्राद्वारे प्रभावित करण्याची शक्ती बाळगू शकतील. पर्यावरणीय प्रश्न, हवामान बदल, सायबर गुन्हे, दहशतवादात वाढणारा तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी अनेक समस्या या तरुण पिढीला भेडसावत आहेत. आज जगातील राज्यकर्त्यांचे सरासरी वय ६२ वर्षे आहे. तरुणांना राजकीय नेतृत्वाकडून फारसा प्रतिसाद दिला जात नाही. त्यामुळे तरुणांचा राजकीय सहभाग हा आवश्यक आहे. शालेय शिक्षण व महाविद्यालय निवडणुकींमधून अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांचे राजकीय सामाजीकरण होत असते. भारतात दुर्दैवाने महाविद्यालयस्तरीय निवडणुका अनेक वर्षांपासून बंद आहेत. तसेच राजकीय पक्षांमध्येदेखील अपवाद वगळता पक्षांतर्गत लोकशाही अस्तित्वात नाही. पक्षांतर्गत निवडणुका होत नाहीत आणि झाल्या तरी त्या देखावास्वरूपात असतात. यातील धोके टाळण्यासाठी सरकारने 'तरुणांना राजकीय शिक्षण' देणे अधिक गरजेचे आहे. इंग्लंडमधील राजकीय सुधारणांबाबत मजूर व हुजूर या दोन्ही पक्षांमध्ये दावे-प्रतिदावे होत असताना तेथेही खरी राजकीय सुधारण्याची गरज असलेल्या ' हाउस ऑफ लॉर्ड्स'बाबत दोघांनी सोयीस्कर मौन बाळगलेले आहे.



शेकाप पनवेल महानगरपालिका (जिल्हा) विधी सेवा अध्यक्षपदी ॲड.वसीम धुरू पटेल यांची नियुक्ती करण्यात आली. त्या नियुक्तीचे पत्र देताना मा.आ.बाळाराम पाटील व इतर मान्यवर.

# पळस्पे ते खारपाडा मनसेतर्फे मोफत टोईंग सेवा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सव काळात मुंबई, ठाणे,पालघर अशा विविध ठिकाणाहुन आपल्या लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी कोकणात मोठ्या प्रमाणात आपल्या परीवारासोबत लगबग सुरू होते परंतु पळस्पे ते खारपाडा या परीसरात अनेक वर्षे गणेशोत्सव काळात गाड्या बंद पडणे खड्यांमुळे गाड्या ना दुरूस्त होणे असे प्रकार दरवर्षी दृष्टीस पडतात बंद पडलेल्या वाहनांमुळे साहजीकच इतर मागील वाहनांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना कळंबोली विभागातर्फे व विभागध्यक्ष उल्हास कदम यांच्या सौजन्याने पळस्पे ते खारपाडा या मार्गावर मोफत टोइंग सेवेचा शुभारंभ महाराष्ट्र नव निर्माण सेनेचे डॅशींग व तडाखेबाज वत्कृत्व असलेले पनवेल महानगरचे प्रवक्ते योगेश चिले यांच्या शुभ हस्ते करण्यात आला आहे. या जनसेवेच्या माध्यमातून रस्त्यात अडकलेल्या वाहनांना तात्काळ मदत मिळणार असून भाविकांचा प्रवास निर्विघ्नपणे पार पडणार असल्याचे बोलले जात आहे या सेवेकरिता उपलब्ध करण्यात आलेल्या टोइंग व्हॅनसोबत दोन अनुभवी मेकॅनिक सतत उपस्थित राहणार आहेत या प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना कळंबोली शहर अध्यक्ष राहुल चव्हाण व विभाग अध्यक्ष उल्हास कदम आणि आदी कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने समाजहितासाठी हाती घेतला गेलेला हा उपक्रम नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना केवळ प्रश्न मांडणारी नाही तर जनतेच्या अडचणी सोडवणारी ताकद आहे. असे या उपक्रमा दरम्यान योगेश चिले यांनी आपली प्रतिक्रीया दिली समाजहितासाठी अशा उपक्रमांद्वारे आम्ही सदैव जनतेच्या सेवेसाठी तत्पर आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने समाजहितासाठी हाती घेतला गेलेला हा उपक्रम नागरिकांच्या सोयीसाठी आणि सुरक्षिततेसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील कबड्डी मुलांचा संघ जिल्हास्तरीय स्पर्धासाठी पात्र

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील मुलांच्या कबड्डी संघाची जिल्हास्तरीय स्पर्धासाठी निवड झाली आहे.

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा नवयुग विद्यापीठ येथे दिनांक २२ ते २३ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेत एकूण ५६ शाळा व महाविद्यालय सहभागी झाले होते. एकूण ६७२ स्पर्धेक होते. या मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील मुलांच्या कबड्डी संघाने तालुका पातळीवर विजय प्राप्त करून पुढे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. या खेळाडूंचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे . या खेळाडूंना महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक प्रा. समीर गाडगीळ व श्री.विनयक शिर्के यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वरील खेळाडूचे व क्रीडा प्रशिक्षकांचे संस्थेचे चेअरमन मा डॉ.रामदास आठवले( केंद्रीय राज्यमंत्री ), उपाध्यक्ष पद्मश्री प्रा.डॉ. सुखदेव थोरात,सचिव डॉ. वामन आचार्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेश प्रभाकर बोराळे , उपप्राचार्य डॉ. राकेश सोनार, उपप्राचार्य प्रा. सुरेंद्र वानखेडे, पर्यवेक्षक प्रा.सुखदेव शिंदे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून विजेत्या खेळाडूला पुष्पगुच्छ देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# विवाहिता बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील ठाणा नाका परिसरात राहणारी आसिया आशिक सरदर (२५) विवाहिता राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# गेल इंडियाची दोन कोटी रुपयांची शाळेस मदत

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव येथील शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या उर्वरित बांधकामासाठी भारतातील अग्रगण्य अशा गेल इंडिया कंपनीच्या सी.एस. आर. निधीतून पहिल्या टप्प्यात सुमारे दोन कोटी रुपयांचा धनादेश रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार आणि भारतीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाचे चेअरमन सुनील तटकरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम शनिवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता माणगाव शहरातील निजामपूर रोड येथील सीबीएसई शाळेत संपन्न होणार आहे.

या सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेत सुमारे २५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या शाळेच्या तीन मजले बांधण्यात येणार आहेत. त्यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी ५ कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती. याच्या पहिल्या टप्प्यात गेल इंडिया कंपनीने सुमारे दोन कोटी रुपयांचा धनादेश देण्यात येणार आहे. तसेच माणगाव शहरात वाहतूक कोंडी होऊ नये. माणगाव आणि इंदापूर बायपासचे काम जलदगतीने सुरू करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. माणगाव शहरातील मोर्बा रोड ते मुंबई गोवा महामार्ग सर्व्हिस रोड, साईनगर कालवा रोड, उतेखोल येथील वाकडाई मंदिराकडे जाणारा मार्ग, भुयारी गटार योजना, भादाव पुल, नाट्यगृह, नाना नाही पार्क, खांदाड आणि इतर भागातील पूर नियंत्रण रेषा रद्द करण्यात यावी, अंतर्गत रस्ते, गटारे, शिवस्मारक आदी कामांमधील काही कामे सुरू आहेत. काही कामे सुरू आहेत. तर काही कामे प्रस्तावित आहेत. हि सर्व कामे सुरू करण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. ती विकास कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात येणार आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसाव्दारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकती त्यांचे विद्यमान मालक / कब्जेदार यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

१. मौजे : पुनाडे ता. उरण जि. रायगड येथील स.न. १३५ हि.नं. ५२ ही शेतजमीन मीळकत.

२. मौजे : पुनाडे ता. उरण जि. रायगड येथील स.न. १३६ हि.नं. ५०६ ही शेतजमीन मिळकत .

३. मौजे : राठीची वाडी ता. पेण जि. रायगड येथील स.न.२४ हि.नं. २ ही शेतजमीन मिळकत.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विकी, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबंध असल्यास कींवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पूराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वताःहून हजर होउन आमचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हीतसंबध नाही. किंवा असल्यास तो हक्क हीतसंबध त्यांनी आमचा अशीलांच्या लाभात सोडून दिला आसून त्याची आमच्या आशिलांच्या लाभात होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येऊन खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्यावर आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दि.२६/०८/२०२५
स्थळ : उरण

सही/-
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**मु. पो. चिरनेर ता. उरण**
**जि. रायगड ता. उरण जि. रायगड**
**मोबा. नं. ९०८२९११९१३**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या नोटीशीद्वारे कळविव्यात येते मौजे खारघर सेक्टर १२ येथील भूखंड क्रमांक जी ९३, हा १००.५९ चौरस मीटर चा भूखंड कै तंजोरे कोंददरामन कल्याणरामन ह्यांना सिडकोने दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या इरादापत्रा ने इरादित केला होता त्यांचे दिनांक १८/०४/२०२५ रोजी निधन झालेले आहे. त्यानंतर सदरहू भूखंडाचे म्हणून श्री. तंजोरे कोंददरामन सुंदररामन ह्यांनी पनवेल येथील मे. वरिष्ठ न्यायालयात चौकशी अर्ज क्रमांक १५८८/२०२४ दाखल केला होता दिनांक ३०/०६/२०२५ रोजी मे. न्यायालयाने श्री. तंजोरे कोंददरामन सुंदररामन व ह्यांना कै श्री. तंजोरे कोंददरामन कल्याणरामन ह्यांचे वारस म्हणून घोषित केले आहे सदरहू भूखंड ते आमचे अशील श्री. मधुलाल रामलालजी जाट इतर २ रा घर क्र. ०९, भूखंड क्र. एफ २६, एकता सहकारी गृहनिर्माण संस्था सेक्टर १२ खारघर नवी मुंबई ४१०२१० ह्यांनी दिनांक २५/०८/२०२५ रोजीच्या नोंदणीकृत करार क्रमांक पवल ४- १५२४३/२०२५ अन्वये कायमस्वरुपी हस्तांतरित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूखंड | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|
| जी ९३ ह्या भूखंड वरील रो हाऊस | १२ | १००.५९ चौ.मी. |

सदरहू भूखंड वरील रो हाऊस बाबत कोणीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भूखंडासंबंधी किंवा त्यावर किंवा त्याचा भागावर विक्री, गहाणवट, लिज, धारणाधिकार, बक्षिस, दान किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याचा पृष्ठयर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबत सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरूप यांची माहिती अन्य तपशिलांसह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल असा कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्यांकडे त्याच्या / तिच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर भुखंड हा सर्व प्रकाराच्या बंधनातुन आणि अन्य हक्कांपासुन आणि अधिकारापासुन किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनातुन मुक्त आहे किंवा सदरहू हक्क संबंधीतांनी स्वेच्छेने सोडून दिलेले आहे. असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीबाबत पुढील व्यवहार पुर्ण करतील यांची नोंद घ्यावी.

दि.२६/०८/२०२५
ठिकाण : नवी मुंबई

सही/-
**ॲड.अनुराधा पी. टिल्लु**
**ॲड.सुनिता राम पाटील**
**कार्यालय नं. २६, प्रभात सेंटर,**
**सेक्टर-१ ए, सीबीडी बेलापूर,**
**ता. जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, माझे अशिल १) श्री. सुरज मारूती गायकवाड, २) श्री. सागर मारूती गायकवाड, ३) सौ. प्रणाली प्रशांत घरत सर्व रा. मु. ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड. खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेत जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक १) श्री. अविनाश काना शेळके, २) श्री. गुरुनाथ पंढरीनाथ फडके, ३) सौ. रेश्मा अविनाश शेळके, ४) श्री. दिपाली गुरुनाथ फडके सर्व रा. वारे, ता. कर्जत, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीकराराने घेण्याचे ठरविले आहे. सदर शेत जमिन मिळकतीचे वर्णन

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वारे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३०/१ | २-६३-००<br>पो.ख. ०-८८-००<br>एकूण ३-५१-०० | १.३७ |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा विकसन करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दि.२६/०८/२०२५

सही/-
**ॲड.राजकुमार व्ही. जाधव**
**शॉप नं. २१, पहिला मजला,**
**महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव**
**बळवंत फडके नाट्यगृह जवळ, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल श्री. गौरव एकनाथ दुधे रा. वैभव बंगलो, सेक्टर १२, रोड नं २, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - लोधिवली, ता. खालापुर, जि. रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| लोधिवली | ९७/५ | ०-२७-००<br>पो.ख.०-०९-००<br>एकूण ०-३६-००<br>पैकी ०-२०-०० | ०.२८ |

सबब सदर मिळकती ही आमचे अशिलांनी मा. दुय्यम निबंधक कार्यालय - खालापुर यांचे कार्यालयात सदर मिळकतीचे नोंदणीकृत साठेकरार केलेला आहे.

सबब सदर मिळकतीबाबत अन्य कोणीही विक्री व्यवहार ठरवू नये वर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित आहे असे समजतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.

दि.२७/०८/२०२५

सही/-
**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**भुमी लँडमार्क, ५०७, सेक्टर १७,**
**प्लॉट नं ३४/३४ क, एक्साईज ऑफीस**
**समोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६.**
**मो.नं. ७२७६४३७८३७**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेली मिळकत ही श्री. पांडुरंग नारायण म्हात्रे व इतर १० यांचे नांवे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धानसर, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री.पांडुरंग नारायण म्हात्रे व इतर १० | ७९/० | १-०३-२०<br>पो.ख. ०-०३-३०<br>एकूण क्षेत्र १-०६-५०<br>यापैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०-५३-२ हे.आर. | १६.०६ |

मौजे धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील वर नमुद मिळकतीचे जमिन मालक ७/१२ मधील नमुद कब्जेदार श्री. पांडुरंग नारायण म्हात्रे व इतर १० यांची वरील नमुद जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमुद केलेल्या जमीनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून २१ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दि.२७/०८/२०२५

सही/-
**ॲड.गणेश एन. भोगाडे**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**शॉप नं.६, जानकी अपार्टमेंट, प्लॉट**
**नं.५०/२४, नित्यानंद मार्ग, काँग्रेस भवन**
**समोर, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मोनं.९३२४७२७४४६**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## ऐन गणेशोत्सवात प्रवाशांचे हाल

# शेकडो बसच्या फेऱ्या रद्द केल्याने प्रवासी त्रस्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील आठ एसटी आगारांतील ४८० बसपैकी १७२ बसेस मुंबई ठाणे येथील गणेशभक्तांना आणण्यासाठी पाठवण्यात आल्या आहेत. त्यामुळे रायगड जिल्हयाच्या ग्रामीण भागातील शंभरहून अधिक बसच्या फेऱ्या रद्द करण्यात आल्या . यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. विशेषतः ग्रामीण प्रवाशांना याचा फटका बसतो आहे. एसटीच्या फेरया कमी केल्याने बसची तासनतास वाट पाहण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे.

दुर्गम गावांतील या बसफेऱ्या रद्द करण्यात आल्या असून, डोंगराळ आणि अवघड रस्ते असलेल्या या गावांतील प्रवाशांसाठी आजही एसटी बसशिवाय पर्याय नाही. पोलादपूर, माणगाव, रोहा, म्हसळा या तालुक्यांमधील प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. सध्या गणेशोत्सव तोंडावर आल्याने ग्रामीण भागातील भाविक विविध वस्तू पूजा साहित्य यांच्या खरेदीसाठी शहरात येत आहेत. आज सकाळी येथील ग्रामस्थ खरेदीसाठी निघाले खरे; मात्र खूप वेळ वाट पाहिल्यानंतरही एसटी बस आलीच नाही. कोकणवासीयांच्या प्रवासासाठी एसटी बस उपलब्ध केल्याने फेऱ्या बंद केल्याचे लक्षात आले. पनवेल-अलिबाग हा मार्ग सर्वात जास्त रहदारीचा आहे. या मार्गावर अलिबाग बस आगाराच्या विनावाहक एसटी बस चालवल्या जातात. या आगारातील ३० बसेस मुंबईकर गणेशभक्तंच्या सेवेसाठी पाठवण्यात आल्याने या मार्गावरील ४० टक्के फेऱ्या रद्द कराव्या लागल्या. त्यामुळे सायंकाळच्या दरम्यान पनवेल बसस्थानकात अलिबागकडे येणाऱ्यांची प्रचंड गर्दी होते. याचा विचार करून या मार्गावरील फेऱ्या वाढवाव्यात, अशी मागणी केली जात आहे.

वरिष्ठ पातळीवरील आदेशाचे पालन करताना विद्यार्थी, नियमित प्रवाशांचा विचार करून फेऱ्या रद्द करतो. रविवारी सुट्टी असल्याने काही फेऱ्या तात्पुरत्या रद्द करण्यात आलेल्या होत्या. ज्या फेऱ्या रद्द करण्यात आलेल्या आहेत, त्यांचे माहिती फलक बस आगारात लावण्याचे आदेश संबंधित आगारप्रमुखांना देण्यात आले आहेत, असे विभागीय नियंत्रक दीपक घोडे यांनी सांगितले. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. महिलांना एसटीच्या तिकीटात ५० टक्के सवलत असल्यामुळे खरेदीसाठी येणारयांमध्ये महिलांची संख्या अधिक आहे. खाजगी रिक्षा किंवा मिनीडोअरने प्रवास करण्यापेक्षा महिला एसटीला अधिक पसंती देतात. बस मुंबईकरांसाठी पाठवण्याबद्दल काहीही हरकत नाही; पण त्यामुळे कोणत्या फेऱ्या रद्द होणार याची कल्पना प्रवाशांना देणे गरजेचे होते आयत्यावेळी फेरया रदद झाल्यामुळे आम्ही अडकून पडलो असे काही प्रवाशांनी सांगितले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिल १) वैजंती माला २) सोनी राकेश सिन्हा ३) प्रमोद तिवारी ४) सुशील कुमार ५) सुधीर कुमार ६) श्री. गौरव एकनाथ दुधे रा. वैभव बंगलो, सेक्टर १२, रोड नं २, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी कायमस्वरुपी विकत घेतली आहे. सदरच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – लोधिवली, ता. खालापुर, जि. रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| लोधिवली | ९७/३/अ | ०-३०-००<br>पो.ख.०-१०-००<br>एकूण ०-४०-००<br>पैकी ०-२०-०० | ०.१८ |
| लोधिवली | ९७/६ | ०-९२-००<br>पो.ख.०-३१-००<br>एकूण १-२३-००<br>पैकी १-००-०० | ०.७८ |

सबब सदर मिळकती हया आमचे अशिलांनी मा. दुय्यम निबंधक कार्यालय - खालापुर यांचे कार्यालयात सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताने कायमस्वरुपी विकत घेतली आहे.

सबब सदर मिळकतीबाबत अन्य कोणीही विक्री व्यवहार ठरवू नये वर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (०७) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार, ॲडव्होकेट यांचेकडे अगर खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आणि बोजारहित आहे असे समजतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व तमाम जनतेस कळावे.
दि.२७/०८/२०२५

**सही/-**
**ॲड.अपेक्षा दामोदर पाटील**
**भुमी लँडमार्क, ५०७, सेक्टर १७,**
**प्लॉट नं ३४/३४ क, एक्साईज ऑफीस**
**समोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६.**
**मो.नं. ७२७६४३७८३७**

मा.श्रीमती.साळवी सो.यांचे न्यायालयात
ॲड.अजित धनराज म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१०८७/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२५

१) श्री. आशाबाई जनार्दन गायकवाड
वय ६५ वर्षे, धंदा गृहिणी
२) सौ. सुशिला सदाशिव म्हात्रे
वय वर्षे, धंदा गृहिणी
३) प्रल्हाद जनार्दन गायकवाड
वय ५२ वर्षे, धंदा शेती
१ते ३ राहणारःमु. पो. ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
४) प्रमिला लक्ष्मण ठाकुर
वय ५० वर्षे, धंदा शेती
राहणारःमु. पो. धुतूम, तालुका उरण, जिल्हा रायगड
५) शर्मिला सुभाष पाटील
वयः ४६ वर्षे, धंदाः गृहिणी
रा. गावदेवी मंदिराजवळ, नागाव, दहिसर, ठाणे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं १ चे पती तसेच अर्जदार २ ते ५ यांचे वडील कै. जनार्दन नरहरी गायकवाड दिनांक २२/०३/२०२४ रोजी मौजे पटवर्धन हॉस्पिटल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथे मयत झाले आहेत. तसेच कै. जनार्दन नरहरी गायकवाड यांची आई कै. ठकुबाई नरहरी गायकवाड फार वर्षापुर्वी मयत झालेल्या आहेत. कै. जनार्दन नरहरी गायकवाड यांना त्यांच्या वडीलांकडून वारसा हक्काने प्राप्त झालेली व त्यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | ॲवार्ड नं./युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| ओवळे | | ५८ | १ | ०-०४-८ |
| | | ५८ | ३ब+६ब | ०-१२-९ |
| | | ६३ | ८ | ०-१७-० |

सदरच्या मिळकती हया नवीन मुंबई प्रकल्पाकरीता सिडकोने संपादित केल्या आहेत वरील संपादित मिळकतीच्या मोबदल्यात खालीलप्रमाणे भुखंड वाटप करण्यात आले आहे.

**भुखंडांचे वर्णन**

| मौजे/नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक | ३ | १४ | ५५० चौ.मी. |

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीतील कै. जनार्दन नरहरी गायकवाड यांचे हिस्स्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख २२ /०८/२०२४५ रोजी माझ्या सही शिक्कयानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.श्रीमती.साळवी सो.यांचे न्यायालयात
ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.११२१/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.३०/०९/२०२५

१. श्रीमती नामीबाई तुळशिराम भगत
वय ६३ वर्षे, धंदा गृहिणी,
२. श्री. विनोद तुळशिराम भगत
वय ४० वर्षे, धंदा शेती,
अर्जदार क्र. १ ते २ रा. रूम नं. ६५५,
पो. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड
३. प्रविण तुळशिराम भगत
वय ४४ वर्षे, धंदा शेती,
४. श्री. प्रशांत तुळशिराम भगत
वय ३५ वर्षे, धंदा शेती,
अर्जदार क्र. ३ ते ४ रा. नौपाडा,
पो. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड
५. सौ. पिंकी विश्वास भगत (लग्नानंतरची)
कु. पिंकी तुळशिराम भगत (लग्नापुर्वीची)
वय ४२ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. ३०३, मानसरोवर स्टेशन रोड, कराडी समाज मंदिर,
जुई, पो. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड
६. सौ. वर्षा राजेश भोईर (लग्नानंतरची)
कु. वर्षा तुळशिराम भगत (लग्नापुर्वीची)
वय ३७ वर्षे, धंदा गृहिणी,
रा. ३४८, मराठी शाळा विंचुबे, ता. पनवेल, जि. रायगड — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ६ हे कै. तुळशिराम बामा भगत यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं १ चे पती तसेच अर्जदार क. २ ते ६ यांचे वडील कै. तुळशिराम बामा भगत हे दिनांक ०२/०७/२०२४ रोजी मौजे बी. ॲण्ड जे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, येथे मयत झाले आहे. तसेच त्यांची आई कै. हासुबाई बामा भगत हया फार वर्षापुर्वी मौजे नौपाडा, पो. कामोठे, तालुका - पनवेल, जिल्हा रायगड, येथे मयत झाल्या आहेत.

अर्जदार नं. १ ते ६ हेच कै. तुळशिराम बामा भगत यांचे वारसदार आहेत तसेच अर्जदार नं. १ ते ६ यांच्याशिवाय कै. तुळशिराम बामा भगत यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै. तुळशिराम बामा भगत यांचे सामाईक मालकीच्या व एकत्रित कुटुंबातील नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**
**मौजे : कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | १८९ | १०१ | २ | ०-२-८ |
| | | १०२ | ४ | ०-९-६ |
| | | १०६ | ५ | ०-१२-९ |
| | | १०७ | ३ | १-१-१ |
| | | १२२ | ४ ब | ०-२३-८ |
| | | १०४ | ३ अ | ०-६-५ |

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | जुना मालमत्ता क्र. | इमारत क्र. | मालमत्तेचे कारपात्र क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड के.एम २३ | ६५५ | १०८ | १३१८ |

कै. तुळशिराम बामा भगत यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमुद केलेल्या मिळकतीस कै. तुळशिराम बामा भगत यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तकार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्कयानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

## गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**

अर्जदाराकरिता ॲडव्होकेट ॲड.उदय प्र. मोकल

### जाहीर नोटीस

उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब 'क' स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.१७७/२०२३
नि.नं.१०/ड
ने.ता.१०/०९/२०२५

(कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या पाटील उर्फ
कै. धर्मा चांगा उर्फ चाग्या गावंड
यांचे कायदेशीर वारस)
१) श्री. महादेव धर्मा पाटील (मुलगा)
वय ७५ वर्षे, घदा-शेती,
रा. केळवणे, पो. केळवणे ता. पनवेल.
जि. रायगड पिन ४१०२०६
२) कै. मारुती धर्मा पाटील (मयत मुलगा तर्फे वारस)
२/१) श्री. कमलाकर मारूती पाटील (मुलगा)
वय-५६ वर्षे धंदा-शेती
रा. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६
२/२) श्री. जनार्दन मारुती पाटील (मुलगा)
वय-४९ वर्षे, धंदा-शेती
रा. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६
२/३) सौ. बेबी काशिनाथ ठाकुर (मुलगी)
वय ५० वर्षे धंदा-शेती
रा.केळवणे, पो.केळवणे, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२०६
२/४) सौ. गुलाब आत्माराम ठाकुर (मुलगी)
धंदा-शेती वय-४३ वर्षे
रा. वळवली. ता. पेण जि. रायगड पिन ४०२१०७
२/५) सौ. सरिता शशिकांत ठाकुर (मुलगी)
वय-३७ वर्षे धंदा-शेती
रा. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल.
जि. रायगड पिन ४१०२०६
२/६) सौ. कमळूबाई सुरेश म्हात्रे (मुलगी)
वय-४५ वर्षे, धंदा-शेती
रा.. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६
३) कै. काळीबाई गणपत पाटील (मयत मुलगी तर्फे वारस)
३/१. कै.धर्माजी गणपत पाटील (मयत तर्फे वारस)
३/१/१) श्री. शुभम धर्माजी पाटील (मुलगा)
वयः२८ वर्षे, धंदा-शेती,
रा. केळवणे, ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६
३/१/२) सौ. कल्याणी ज्ञानेश्वर गावंड (मुलगी)
वयः ३१ वर्षे, धंदा शेती,
रा. दुरशेत, ता. पेण जि. रायगड, ४०२१०७
३/२) श्री. कमलाकर गणपत पाटील (मुलगा)
वय-३६ वर्ष, धंदा-शेती
रा. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६
३/३) श्री. मधुकर गणपत पाटील (मुलगा)
वय-५१ वर्षे धंदा
रा. केळवणे, पो. केळवणे, ता. पनवेल,
जि. रायगड पिन ४१०२०६
३/४) श्रीमती. मुक्ताबाई रामनाथ गावंड (मुलगी
वय-५६ वर्षे धंदा-शेती
रा. पिरकोन, पो. आवरे, ता. उरण,
जि. रायगड पिन. ४१०२०६
४) कै. बाळीबाई बाळाजी म्हात्रे (मयत तर्फ वारस)
४/१) श्री. हरीश्चंद्र बाळाजी म्हात्रे (मुलगा)
वयः५९ वर्षे, धंदा-शेती,
रा. केळवणे, ता. पनवेल जि. रायगड, ४१०२०६
४/२) श्री. मारूती बाळाजी म्हात्रे (मुलगा)
वयः ५२ वर्षे, धंदा-शेती,
रा.केळवणे, ता.पनवेल, जि.रायगड
४/३) सौ. यशोदा अनंत पाटील (मुलगी)
वयः ४५ वर्षे, धंदा-शेती,
रा. केळवणे वा. पनवेल जि. रायगड ४१०२०६
४) कै.सोमुबाई कृष्णा म्हात्रे (मयत मुलगी तर्फे वारस)
३/१) श्री. रघुनाथ कृष्णा म्हात्रे (मुलगा)
वय-५१ वर्षे धंदा-शेती
रा. केळवणे, पो. केळवणे
ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या पाटील उर्फ कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या गावंड यांचे निधन दिनांक १७.१०.१९८० रोजी त्यांच्या राहत्या घरी मु. केळवणे पो. केळवणे ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन झालेले आहे. कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या पाटील उर्फ कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या गावंड यांच्या मृत्यु पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या पाटील उर्फ कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या गावंड कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदाराचे असे आहे की, अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.धर्मा चांगा उर्फ चांग्या पाटील उर्फ कै. धर्मा चांगा उर्फ चांग्या गावंड यांच्या मालकी हक्क असलेल्या मौजे : पुनाडे ता. उरण जि. रायगड येथे असलेली खालील शेतजमीन मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पुनाडे, ता. उरण, जि. रायगड**

| अ. क्र. | गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुनाडे | ७७ | ४ | ००-०९-० | २.१२ |
| २ | पुनाडे | ८१ | ३ | ००-३५-२० | २.०० |

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणे करीता वरील अर्जदार यांनी मे.न्यायालय, वरीष्ठ स्तर ठाणे यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह में. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
ठिकाण : पनवेल
दि.०७/०८/२०२५

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.क.स्तर, उरण | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.क.स्तर, उरण |
|---|---|---|

मा.जागुस्टे सो.कोर्ट
ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.८०४/२०२५
नि.नं.१९/ड
ने.ता.२४/०९/२०२५

१. श्री. पंढरीनाथ नामदेव पाटील
वय ७८ वर्षे, धंदा व्यवसाय
२. श्री. वसंत नामदेव पाटील
वय ७६ वर्षे, धंदा व्यवसाय
रा. मु. पो. नावडे, ता. पनवेल, जि. रायगड
३. श्रीमती रमाबाई अनंता भोईर
वय - ७४ वर्षे, धंदा गृहिणी
रा. नितलस, पो. वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड
४. श्रीमती विमल यशवंत पाटील
वय ७२ वर्षे, धंदा गृहिणी
रा. राजेश निवास, नवापाडा, डोबिंवली, पश्चिम, जि.ठाणे — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं १ ते ४ यांचे वडील कै. नामदेव नारायण पाटील हे दिनांक ०९/०५/२०१३ रोजी मौजे नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची आई कै. भिमाबाई नारायण पाटील ह्या दिनांक २१/०८/२००६ रोजी मौजे नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै. नामदेव नारायण पाटील हयांची पत्नी कै. गोदावरी नामदेव पाटील हया दिनांक १४/०३/२०२० रोजी मौजे नावडे, ता. पनवेल, जि. रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै. नामदेव नारायण पाटील यांचे नावे असलेल्या वडीलोपार्जित तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**
**मौजेः नावडे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| नावडे, ता.पनवेल, जि.रायगड | १५९ | १६८ | २ | ०-२३-० |
| | | १९५ | ३ | ०-१२-० |
| | | १६७ | १ | ०-२१-० |
| | | २०७ | ४ | ०-२१-८ |
| | ११३/४९ | ९ | २ | ०-४१-५ |
| | ११३ बी/८४ | ९ | ३ | ०-११-४ |
| | ११३ | २५३ | ० | ०-५-० |
| | ११३ | २५६ | ० | १५-१-८ |
| | ११३ | २३० | ४ | ०-०५-१ |
| | ११३ | २६० | ० | ०-६९-३ |
| | ११३ | ६ | ४ | ०-०६-१ |
| | ११३ अे/८३ | ६ | ४ पी | ०-८-० |
| | | २२१ | १ पी | ०-५-८ |
| | ११३ अे/८३ | २२३ | ४ | ०-४-० |
| वळवली, ता.पनवेल, जि.रायगड | ७६ | १४ | १ | १-६७-४ |
| | | ३० | ४ | ०-१५-० |
| | | ५५ | १ | ०-६५-० |
| | | १०२ | २ | ०-१३-४ |
| | | १०३ | १ | ०-३५-२ |
| | | १०३ | ४ | ०-१४-९ |
| | | ५७ | ४ | ०-४-४ |

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**मौजे : वळवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वळवली, ता.पनवेल, जि.रायगड | ७८ | ७ | ०-३०-००<br>पो.ख. ०-०७-००<br>एकूण क्षेत्र ०-३७-०० | ०.५६ |
| | ७८ | ३/४/६/९/ ११/१३/अ | ३-८४-८०<br>पो.ख. ०-५५-३०<br>एकूण क्षेत्र ४-४०-१० | ६.९१ |
| | ७८ | २ | ०-१०-४०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-१०-४० | ०.२८ |
| | ७८ | १५ | ०-०७-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-०८-०० | ०.१२ |
| | ७८ | १४ | ०-०९-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण क्षेत्र ०-१०-०० | ०.२२ |
| | ७२ | ७/८/९ | ०-९३-००<br>पो.ख. ०-१३-००<br>एकूण क्षेत्र १-०६-०० | १.५४ |
| | ७२ | ५ | ०-०३-००<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण क्षेत्र ०-०३-५० | ०.०६ |
| | ७२ | ४ | ०-१८-२०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण क्षेत्र ०-१९-७० | ०.४७ |
| | ७२ | १८ | ०-१३-१०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकूण क्षेत्र ०-१४-४० | ०.२८ |
| | ७२ | १२ | ०-४६-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण क्षेत्र ०-४८-०० | १.५० |
| | ७२ | १०/१३/ १४/१६ | १-९३-२०<br>पो.ख. ०-२७-३०<br>एकूण क्षेत्र २-२०-५० | ४.१० |
| | ७२ | १ | ०-०७-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-०७-०० | ०.२५ |

तसेच वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत कै. नामदेव नारायण पाटील यांचे वारसदार या नात्याने कै. नामदेव नारायण पाटील यांचे हिस्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भुखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरीता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. व. स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमुद केलेल्या मिळकतीतील कै. नामदेव नारायण पाटील यांचे हिस्स्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.क.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# प्रश्नांची उकल करण्यासाठी नागरिकांना प्रशासनालाच करावे लागतेय जागरूक

**दै.रायगड नगरी । माथेरान**

जेमतेम पाच हजारांच्या आसपास लोकसंख्या असणाऱ्या छोट्याशा माथेरान पर्यटनस्थळावरील नागरिकांना आपल्या न्यायहक्कांसाठी, विविध मागण्यांसाठी, आवश्यक सोयीसुविधा बाबतीत सातत्याने प्रशासनाला साद घालून जागरुक करावे लागते आहे ही बाब खरोखरच हास्यास्पद असल्याचे आता सर्वच स्तरातून बोलले जात आहे. रस्त्यांची झालेली वाताहत असो, विविध प्रभागात वीज, पाण्याची समस्या असो किंवा वाहतुकीचा नेहमीचाच गहन प्रश्न असो ह्या सर्व गोष्टी संबंधित प्रशासन आणि त्यांचे कर्मचारी वर्ग दररोज उघडया डोळ्यांनी पहात आहेत परंतु त्यांना जनतेची कामे मार्गी लावण्याची मुळात मानसिकता नसल्याने नागरिकांना सोशल मीडियाचा आधार घेऊन आपली कैफियत, गार्हाणे मांडण्याची वेळ आली आहे.

प्रत्येक कामात झोकून देऊन काम करणारे सक्षम अधिकारी माथेरान शहराला लाभत नाहीत तोवर स्थानिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. दस्तुरी पासून गावात येण्यासाठी ज्या क्ले पेव्हर ब्लॉकच्या मार्गावर खड्डे पडलेले आहेत यातून मार्गक्रमण करताना ई रिक्षा चालकांना कशाप्रकारे तोंड द्यावे लागते. याच खड्डेमय मार्गावर दररोज चार ते पाच ई रिक्षांची डागडुजी करण्यासाठी पनवेलला न्यावे लागते आहे. गणेशोत्सव आलेला असताना अद्यापही काही ठिकाणी विजेचा प्रश्न निर्माण झाला आहे तर काही भागात मातीचे रस्ते पावसामुळे अक्षरशः नाल्यात रूपांतर झालेले आहेत ते सुद्धा पूर्ववत केलेले नाहीत.त्यामुळे प्रशासनाच्या गलथान कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. गणेश दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची यावेळी



त्रेधातिरपीट उडणार असून खड्डेमय रस्त्यावरून विजेच्या अभावी अंधारामुळे चालताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासनाने आपल्या कामावर लक्ष केंद्रित करून जनतेची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्या त्या विभागातील दक्ष नागरिक बोलत आहेत.

यावेळी बोलताना मा.उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव म्हणाले की, सध्या माथेरान नगरपरिषदेत नगरसेवक नसल्याने प्रशासक राजवट आहे त्यामुळे नगरसेवक अस्तित्वात असल्यास शहराला दैनंदिन भेडसावणाऱ्या छोट्या मोठ्या समस्या सोडविण्यास मदत होत होती.आणि प्रशासनालाही माथेरान पर्यटन हिताच्या प्रश्नांवर निर्णय घेता येत होते.हासुद्धा एक प्रशासकीय प्रक्रियेचा महत्वाचा भाग असल्याने त्यांची पुढील अंमलबजावणी करता येते.तसेच नगरपरिषद कार्यालयात गेल्या कित्येक वर्षात असलेली रिक्त पदे अद्याप भरण्यात आली नसल्याने अस्तित्वात असलेल्या कर्मचाऱ्याकडे कोणता विभाग आहे कामावर रुजू असलेले कर्मचारी नित्यनियमित येत आहेत का? नागरिकांनी लेखी सादर केलेल्या निवेदनांचे निराकरण होत आहे का हे सर्व प्रश्न अनुत्तारितच आहेत.माथेरान हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असल्यामुळे या मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून मध्यंतरीच्या काळात येथील समस्या सोडविण्याकरिता अधिकारी वर्गसोबत माथेरान च्या विविध समस्या सोडविण्यासाठी बैठकी घेण्यात आल्या होत्या परंतु संबंधित अधिकारी वर्गाकडून अद्याप अंमलबजावणी अथवा ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत एकंदरीत अशी परिस्थिती असताना आमदार यांनी पुन्हा अशा स्वरूपाच्या बैठकीचे आयोजन केल्यास येथील पर्यटन व्यवसायात भर पडण्यास सोयीचे होईल.

# पनवेल रेल्वे स्थानकाजवळ एनएमएमटीचा ब्रेक फेल



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकाजवळ एनएमएमटीच्या ७३ नंबर बसचा ब्रेक फेल झाल्याची घटना घडली आहे. चालकाच्या प्रसंगावधानाने मात्र मोठी हानी टळली.

कल्याण येथून पनवेल येथे आलेली एनएमएमटी बस (बस क्रमांक एमएच ४३ - एच- ५३३४) पुन्हा निघाली असता अच-ानक बसचा ब्रेक फेल झाला.चालकाच्या हे लक्षात आल्यावर त्याने बसचे स्टेअरिंग रेल्वे स्थानकाच्या संरक्षक भिंतीकडे वळवले.तेव्हा ती बस त्या भिंतीवर जावून आदळली.

चालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवले नसते तर समोरच बस स्टॉप मध्ये बसची वाट पाहत असलेले प्रवासी आणि रिक्षा स्थानकाजवळील प्रवासी यांना आपला जीव गमवावा लागला असता.दरम्यान यामध्ये आणखी काही दुर्घटना झाल्याची माहिती मिळाली नसून बसच्या पुढील भागाचे चांगलेच नुकसान झाले आहे.

# तळोजातील खड्ड्यात तरुणाचा बळी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील खड्ड्यांमुळे अपघातांचे सत्र सुरूच आहे. जुलै महिन्यात झालेल्या अपघातामध्ये तरुणाच्या हातावरून अवजड वाहनाचे चाक गेल्याची घटना ताजी असताना तळोजातील सीईटीपी प्रकल्पाशेजारी गतिरोधकालगत असणा-या खड्ड्यांमुळे एका दुचाकीस्वाराला आपले प्राण गमावण्याची वेळ आली.

तळोजा येथील सीईटीपीसमोरून ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथे राहणारे ३६ वर्षीय विवेक तिवारी हे रोडपाली येथे दुचाकीने जात असताना डंपरने भरधाव धडक दिल्यामुळे विवेक यांचा पाय डंपरच्या चाकाखाली आला. विवेक यांच्या मांडीला जबर दुखापत झाल्यावर वाहतूक पोलीस कर्मचारी नितिन भोसले यांनी त्यांना नजीकच्या आनंद रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक झाल्याने प्राणवायू लावून रुग्णवाहिकेने त्यांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले. अखेर एमजीएम रुग्णालयात विवेक यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या दरम्यान घटनास्थळी धाव घेऊन स्थानिक पोलिसांना तपास सुरू केला.

डंपरचालक हिरालाल यादव याला या प्रकरणी ताब्यात घेतल्यावर तळोजा पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केल्यावर खड्ड्यामुळे दुचाकी चालक अचानक समोर आल्याने अपघात घडल्याचे डंपर चालक हिरालाल याने पोलिसांना सांगीतले. पोलीस उपनिरीक्षक उमेश गुठाळ हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत. विवेक हे खासगी कंपनीत नोकरी करतात. तळोजा पोलीस ठाण्यात या प्रकरणी डंपरचालक हिरालाल यादव याच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

# भिसेगाव चर्च रोड परिसर विकासापासून वंचित



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील कर्जत स्थानकाच्या अगदी जवळ असणाऱ्या चर्च रोड परिसर विकासापासून वंचित राहिला आहे. अर्धवट गटारे, घाणीचे साम्राज्य,पथदिव्यांची अर्धवट सोय,भिकाऱ्यांची वर्दळ आणि दुचाकी वाहनांची अवैध पार्किंगमुळे येथील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.परिसरात या अनेक समस्या उद्भवल्याने आम्ही नक्की नगरपरिषद हद्दीत राहतो की, ग्रामपंचायत हद्दीत राहतो असा प्रश्न येथील नागरिकांना पडला आहे.

कर्जत नगरपरिषद हद्दीतील विविध भागात लाखो रुपये खर्च करून विकास काम सुरू आहेत परंतु प्रामुख्याने नागरी वस्तीतील काम करण्यात पालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे. पालिका स्थापने पासून अर्धवट असलेली गटारे आजही त्याच स्थितीत असल्याने उघडी गटारात कचरा पडून दुर्गंधी सुटत असते. स्वच्छतेच्या नावाने येथे कायम घाणीचे साम्राज्य पसरलेले असते. नागरिकांनी ओरड केल्यानंतरच कचरा उचलला जातो.असे येथील नागरिक सांगतात. कचरा संकलन करणे आणि शहर स्वच्छ ठेवणे हे संबंधित आरोग्य आणि स्वच्छता विभागाचे काम असताना या सर्वबाबींकडे दुर्लक्ष करीत असल्याच्या आरोप येथील नागरिक करीत आहेत.

कर्जत स्थानक जवळ असल्याने प्रवासी वर्ग आपली वाहने चर्च रोड परिसरात बिनधक्तपणे पार्क करून जातात. परिणामी या रोडवर एखादे मोठे वाहन आल्यास रस्त्यावर ट्रॅफिक निर्माण होते. दोन मोठी वाहने जातील इतका मोठा रस्ता असताना केवळ बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे एक वाहन जाण्यास सुध्दा अडथळा निर्माण होतो.

तर दुसरीकडे या परिसरातील बंद असलेल्या इमारती खाली भिकाऱ्यांनी ठिय्या मांडला आहे. भिकाऱ्यांमुळे घाणीचे साम्राज्य पसरले असून मोठ्या प्रमाण दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे येथून जाताना नागरिकांना नाका तोंडावर हात ठेऊन जावे लागत आहे.रात्रीच्या वेळी ही भिकारी मोठ्या प्रमाण गोळा होऊन याच ठिकाणी बसून दारू प्राशन करून मोठ मोठ्याने बडबड करून शिवीगाळ करीत असतात त्यामुळे परिसरातील नागरिकांची डोकेदुखी वाढली आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने येथील सिमेंट काँक्रिट रोडवर मोठ्या प्रमाणात शेवाळ साचलं आहे. या रस्त्यावर साचलेल्या शेवाळामुळे अनेक महिला,ज्येष्ठ नागरिक ,शालेय विद्यार्थी पाय घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. प्रस्तुत प्रतिनिधी यांनी कर्जत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना दिनांक १५ ऑगस्ट रोजी फोन द्वारे याबाबतची तक्रार केली होती परंतु अद्याप प्रशासनाकडून कोणतीही कारवाई केली नाही. गणपती सण तोंडावर आल्याने ह्या रस्त्यावर साचलेल्या शेवाळामुळे एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतर पालिकेला जाग येईल असे येथील नागरिकांना वाटत.

रस्त्यावरील अर्धवट अवस्थेत अस-लेले पथदिवे, भिकाऱ्यांचा ठिय्या, उघडी गटारे, अस्तव्यस्त पडलेला कचरा, घाणीचे साम्राज्य, मोठ्या प्रमाणात दुर्गंधी, बेकायदेशीर पार्क केलेली दुचाकी वाहने अशा एक ना अनेक समस्यांमुळे येथील नागरिक हैराण झाले आहे.

# मुरुडमध्ये नारळाचे झाड पडून गुरांचा गोठा जमीन दोस्त



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

गेल्या दोन चार दिवसांपासून मुरुडमध्ये पडत असलेल्या जोरदार पावसामुळे मुरुड कोळीवाडा परीसरातील मामा पेटकर यांच्या वाडीत नारळाचे झाड पडून गुरांचा गोठा जमीन दोस्त झाला, गोठ्यात असलेले पारडी व वासरू सुदैवाने बचावले !

दि.२५ ऑगस्ट रोजी दुपारी एकच्या सुमारास जोरदार वारा व पाऊस सुरू असताना अचानक नारळाचे झाड गुरांच्या गोठ्यावर पडले आणि गुरांचा गोठा जमीन दोस्त झाला,यागोठ्यात एक पारडी व वासरू होते.काळ आला होता पण वेळ आली नव्हती नशीब बलवत्तर म्हणून पारडी व वासरू सहिसलामत वाचले मात्र यात गुरांचा गोठा जमीन दोस्त झाल्याने पेटकर यांचे लाखोचे नुकसान झाले.

